**कालमर्यादा**

क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४५११/२०२०
कार्यालय जिल्हा परिषद,नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :-२४ जुलै, २०२०

प्रति,

गट शिक्षणाधिकारी ,पंचायत समिती --------------(सर्व)

विषय :- बदलीस पात्र व बदली अधिकार प्राप्त प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) प्रारुप यादया प्रसिध्दीबाबत.------- सर्वसाधारण बदल्या -२०१९

संदर्भ:- १) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था -१४दि.२७ फेब्रुवारी,२०१७

२) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४६१७/प्र.क्र.५६७/आस्था -१४दि.१५ फेब्रुवारी,२०१८

३) ग्राम विकास विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था –१४ दि.१५ एप्रील,२०१७ दि.१७ मे,२०१७, दि.३१ मे,२०१७

४) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.१२-१७/३०९० दि.२९/०४/२०१७ ( अवघड क्षेत्राची घोषित यादी. ८६ गांवे)

५) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.३५-१८/१५७० दि.०१/०३/२०१८ ( महिला शिक्षकांसाठी काम करण्यास प्रतिकुल अवघड क्षेत्राची घोषित यादी. ४९ गांवे)

६) ग्राम विकास विभागाचे शासन पूरकपत्र क्र.जिपब-४८१९/प्र.क्र.३७३/आस्था –१४ दि.२८ मे, २०१९

७) कक्ष अधिकारी,ग्राम विकास विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.२८२/आस्था-१४ दि.१५ जुलै, २०२०

८) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३३०/२०२० दि.१६.०७.२०

९) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३८१/२०२० दि.१७.०७.२०

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णये व शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारीत धोरण निश्चित केलेले आहे. संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयातील परिच्छेद II) ३. मधील तरतूदीनुसार बदलीस पात्र प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) प्रारुप जेष्ठता यादया यासोबत खालील नमुद केल्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| **संवर्गाचे नांव** | **सर्वसाधारण क्षेत्र** | **अवघड क्षेत्र** |
|---|---|---|
| १) सहाय्यक शिक्षक (इयत्ता १ ली ते ५ वी) | अ.क्र. ०१ ते ९४० | अ.क्र.०१ ते ४१ |
| २) विज्ञान विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते १५५ | अ.क्र. ०१ |
| ३) भाषा विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते १७२ | अ.क्र. ०१ ते ०९ |
| ४) सामाजिक शास्त्र विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते २१ | अ.क्र. निरंक |
| ५) उच्च श्रेणी मुख्याध्यापक | अ.क्र. ०१ ते ०८ | अ.क्र.निरंक |

संदर्भिय क्र.९ अन्वये दिलेल्या कालमर्यादेनुसार बदली प्रक्रिया-२०२० तातडीने राबविण्यात येत आहे. संदर्भ १ चे शासन निर्णयातील परिच्छेद II -३ मध्ये "सदर यादयांबाबत आक्षेप असल्यास यादया प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसात शिक्षणाकाऱ्यांकडे यादयांमधील दुरुस्तीसाठी संबधित शिक्षकास अर्ज करता येईल." अशी तरतूद आहे. परंतू सध्यास्थितीत कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचे प्रादुर्भावामुळे जिल्हा कार्यालयात गर्दी टाळावयाची असल्यामुळे व सदर बदली प्रक्रीया तातडीने राबवावयाची असल्यामुळे सदर प्रारुप यादयांमधील दुरुस्तीसाठी **संबधित शिक्षकांनी पंचायत समिती स्तरावर गट शिक्षणाधिकारी यांचे कडे दि.२७/०७/२०२० पर्यंत सबळ पुराव्यानिशी अर्ज करावे.** विहित कालावधीनंतर प्राप्त अर्ज ग्राहय राहणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. तसेच संबधित **पंचायत समितीनी प्राप्त अर्जाची पडताळणी करुन अर्ज दि.२८/०७/२०२० रोजी खास दुतामार्फत जिल्हा कार्यालयास सादर करावे.** व खास दुतांनी आपले समक्ष यादयांमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी( प्राप्त अर्जावर यादीचा अनुक्रमांक नमुद करावे)



Scanned with CamScanner

सर्वसाधारण क्षेत्राकरीता क्षेत्रनिहाय सलग सेवा कालावधी हा १० वर्षाचा तसेच अवघड क्षेत्रासाठी ०३ वर्षाचा आहे. तसेच सर्वसाधारण क्षेत्राकरीता विद्यमान शाळेतील सलग सेवा कालावधी ३ वर्षाचा आहे.

गट शिक्षणाधिकारी यांनी सदहू यादया आपले कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्दीसाठी लावाव्यात. तसेच सदर यादया इतरही सामाजिक प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्द कराव्यात.

बहुतेक शिक्षकांच्या सेवापुस्तिकेमध्ये शाळांचे स्थानांतरणाच्या नोंदी राहत नसल्यामुळे कार्यालयाला त्यांच्या पुर्वीच्या शाळांच्या क्षेत्राची (सर्वसाधारण/अवघड) माहिती घेणे शक्य होत नाही. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे जे शिक्षक बदली पात्र ठरत नसतांना सुध्दा त्यांची नावे सदहू प्रारुप बदलीपात्र यादीमध्ये आलेले असेल अशा शिक्षकांनी आपली नावे कमी करण्यास्तव लेखी अर्ज विहित मुदतीत सादर करावे. अन्यथा चुकीची बदली झाल्यास त्यास सर्वस्वी संबधित शिक्षक जबाबदार राहील याची गांभीर्याने स्पष्ट नोंद घ्यावी. तरी सर्व शिक्षकांनी सदहु प्रारुप यादी काळजीपुर्वक पहावी. वर नमुद केल्याप्रमाणे सेवा कालावधी नुसार ज्या बदलीपात्र शिक्षकांचे नाव यादीत आलेले नसेल त्यांनी विवरणपत्र-अ मध्ये माहिती भरुन संबंधित गट शिक्षणाधिकारी कार्यालयाला विहित मुदतीत दयावी.

सबब, वरील प्रमाणे माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहपत्रः- वरील प्रमाणे संवर्ग निहाय जेष्ठता यादया.

( चिंतामण वंजारी )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

**प्रतिलीपी :-**

१) मा. अध्यक्षा,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
२) मा. उपाध्यक्ष,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.
३) मा. सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर
४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
५) मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),जिल्हा परिषद,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

Scanned with CamScanner